**नियमित दिवाणी दावा क्रमांक ३२०/२०११ मधील नि.क्र.१२५ वरील आदेश**
**(प्रविण उपाध्ये विरुध्द सुभाष उपाध्ये)**
**CNR No.MHSN02-001423-2011**

१. वादी तर्फे प्रतिवादी क्र.१७ नलिनी उर्फ पुष्पावती अशोक चिमाण्णा यांच्या वारसांना रेकॉर्डवरती घेणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी मुळ दावा वाटपासाठी, कब्जासाठी आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१७ नलिनी उर्फ पुष्पावती अशोक चिमाण्णा या दिनांक ०८.०३.२०१५ रोजी मयत झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र.१७ यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे वारस असून त्याना अन्य कोणीही जवळचे वारस नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसांना रेकॉर्डवरती घेण्याकरीता त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे वादींचा अर्ज अतिशय मोघम आहे. त्यामुळे त्याच्यावर ५०००/- रुपये कॉस्ट बसविण्यात यावी अशी प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षकारांच्या परस्पर विरोधी कथनांना अनुसरुन पुढील विवाद मुद्दा माझ्या समोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेण्याबाबतचा अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो का ? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. सदर अर्जास अनुसरुन वादी–प्रतिवादी यांच्या दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. निर्विवादपणे सदरहु दावा चौकशीसाठी प्रलंबित आहे ही वस्तुस्थिती आहे.

६. वादी यांनी मुळ दावा वाटपासाठी, कब्जासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१७ यांचे दिनांक ०८.०३.२०१५ रोजी निधन झालेले असल्यामुळे प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसाना रेकॉर्ड वर घेणे व त्यांना पुराव्याची संधी मिळणे आवश्यक आहे. जर प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसांना रेकॉर्ड वर घेतले नाही, तर त्यांच्या विरुध्द केस अबेट होउुन सदरची केस त्यांच्याविरुध्द आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे केसचा गुणदोषावर निकाल होण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसांना दावेकामी रेकॉर्डवर आणणेस परवानगी देणे आवश्यक आहे.

७. अशा परिस्थितीत प्रस्तुत दाव्याचे कामकाज सुलभतेने करण्याच्या दृष्टीने वादींचा प्रतिवादी क्र.१७ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबत अर्ज मंजूर केला तर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादी यांना अधिक कैफियत देण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे वादीतर्फे प्रतिवादी क्र.१७ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबतचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ चे निष्कर्षादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. वादीतर्फे प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी १५ दिवसाचे आत, दाव्यामध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत त्याच मुदतीत केसकामी दाखल करावी.

३. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

४. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale

Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.04.11 11:28:26 +0530

सांगली. (अ. अ. मेहेंदळे)
दिनांक– १०.०४.२०२३ दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर,<br>सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | **१०.०४.२०२३** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | **११.०४.२०२३** |